ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# भारतीय समाजात स्त्रियांचे सामाजिक स्थान : काल आज आणि उद्या

** कु. समीना दस्तगीर अत्तार,*

** सहाय्यक प्राध्यापक, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, बदलापूर (पु )*

भारतीय समाजात स्त्रीचे स्थान शक्तीच्या रूपात मिळाले आहे. विद्या, विभूती आणि शक्तीची क्रमशः सरस्वती, लक्ष्मी व पार्वती किंवा दुर्गेच्या रूपात सर्वत्र पूजा होते. महर्षि मनुने म्हटले आहे “यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता" जिथे स्त्रीची पूजा होते तिथे ईश्वराचा निवास असतो.**प्राचीन काळात सहशिक्षणाचेही उल्लेख** सापडतात. वाल्मीकी ऋषीच्या आश्रमात लव कुशाबरोबर ऐंत्रेयीने शिक्षण घेतले होते. मुलींचे लहान वयात विवाह होत नसत. स्वयंवर मांडून आपला पती निवडण्याचे त्यांना स्वातंत्र्य होते. गृहस्वामिनी, माता म्हणून तिला पिता व आचार्यांपेक्षा उच्च दर्जाचे स्थान दिले गेले होते.**महाभारतात "गुरुणां चैव सर्वेषां माता परमं को गुरू"** असा उल्लेख येतो. आपल्या देशात एक काळ असाही आला की सगळ्या वाईटाचे मूळ स्त्री जातीलाच मानले गेले. तिला पायातली चप्पल समजले गेले. सतीची चाल, बालविवाह आणि विधवांकडे तिरस्काराने पाहिले गेले, संतानी, कवींनी स्त्रियांप्रती अत्यंत कटू दृष्टिकोन स्वीकारला होता **कारण स्त्रीमुळे परमेश्वर साधनेत** अडथळा येतो अशी त्यांची समजूत झाली होती. पातिव्रत्य धर्माचा उपदेश केवळ स्त्रीला करण्यात आला. पुरुषांसाठी पत्निव्रत धर्माचा कोणताही उपदेश करण्यात आला नाही. कारण त्याची आवश्यकताच वाटली नाही. उलट त्याला फुला फुलांवर गुंगणारा भुंगा समजून सूट देण्यात आली.**"वृद्ध रोगी, मूर्ख, निर्धन, आंधळा बहिरा,** रागीट, दीन, हीन असा पती असला तरी पत्नीने त्याची सेवा केली पाहिजे न केल्यास ती सरळ नरकात जाईल परंतु असेकुठेही म्हटले नाही की दुर्दैवाने पत्नी आंधळी, बहिरी, रागीट इ. असेल व पतीने तिची सेवा न केल्यास त्याला नरकात जावे लागेल" असे तुलसीदासाचे मत आहे. **महर्षि दयानंदांच्या मते, 'स्त्रीचा पूजनीय देव** म्हणजे पती आणि पुरुषाची पूजनीय देवी स्त्री आहे". मध्यकाळात एकांगी उपदेशामुळे स्त्री आत्महीन झाली होती. परंतु पडदा पद्धतीने तिचे उरले सुरले आत्मबलही हिरावून घेतले. या पद्धतीचे समर्थन हिंदू-मुसलमान दोघांनीही केले. **पडदा पद्धतीमुळे स्त्रियांची स्थिती** दयनीय झाली. शंकराचार्य स्त्रीला नरकाच्या दाराची उपमा देतात. तुलसीदास स्त्रीला शूद्र म्हणतात. अशा रीतीने हळूहळू समाजात स्त्री ची प्रतिष्ठा कमी होत गेली.**जरी**

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**वर्तमानकाळात बालविवाह सतीची** चाल, विधवा यांच्याकडे पाहण्याचा पूर्वीचा दृष्टिकोन राहिला नाही. तरी पण हुंडा प्रथा, अपहरण, बलात्कार इ. समस्यांनी आज परिसीमा गाठली आहे. हुंड्याची प्रथा जीवघेणी बनली आहे. सामाजिक पुनर्जागरणाच्या काळात महान समाज सुधारकांनी सतीची चाल नष्ट केली, विधवांचा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण इत्यादी वर जोर दिला. **स्त्रियांना आपले**

**महत्त्व कळून आले**. अशा प्रकारे समाजसुधारकांचे सामूहिक प्रयत्न, राजकीय आणि सामाजिक जागृती पाश्चात्य संस्कृतीव विचारांच्या प्रभावामुळे स्त्रीने गुलामीच्या बेड्या तोडल्या आणि ती मुक्तीच्या दिशेने गेली. सामाजिक आणि व्यावसायिक अशा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्री ने प्रवेश केला. आहे. व ती सेवा करीत आहे. **तिने ज्ञान दान करून गुरुपदाला** सुशोभित केले. खेळ, गिर्यारोहण, मॉडेलिंग, नृत्य संगीत इत्यादी विविध क्षेत्रांवर स्त्रियांचे वर्चस्व आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पहिल्या महिला अध्यक्ष विजयालक्ष्मी पंडित होत्या, भारतात बंगालच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री सरोजिनी नायडू बनल्या. **देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान** इंदिरा गांधी राहिल्या. अनेक प्रांतांत महिला राज्यपाल आहेत. संसदेत विधानसभेत महिला प्रतिनिधी महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. स्वातंत्र्यानंतर समानतेच्या क्षेत्रात एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. **भारतीय घटनेत पुरुष आणि स्त्रियांना** पूर्ण स्वातंत्र्य व लिंग भेद न मानता सर्व अधिकार मिळावेत असे नमूद करण्यात आले आहे. हिंदू वारसाहक्काच्या कायद्यानुसार स्त्रियांनाही संपत्तीत समान हक्क मिळाला. हिंदू विवाह कायद्यानुसार त्रासदायक वैवाहिक संबंध संपविण्यासाठी घटस्फोटाची संमती देण्यात आली.

**हुंडा घेणारा व देणारा दोघेही** शिक्षेस पात्र समजण्यात आले. अशाप्रकारे स्त्रियांना घटनात्मक सुरक्षितता देण्यात आली. आज भारतात स्त्री-पुरुष दोघे मिळून काम करतात. समाजातील प्रत्येक समस्येविरुद्ध आवाज उठवितात. स्त्रिया शोषणाला प्रतिकार करतात. यावरून हे कळते की आता स्त्रियांमधे पुरेशी जागरुकता आली आहे. **अनेक सुधारणा झाल्या तरी** आणखी काही समस्या शिल्लक आहेतच. स्त्रियांना मताधिकार मिळाला पण शोषणाची समस्या आहेच. हुंडा प्रथा, बाल विवाह वगैरे चालूच आहे. स्त्रियांना सर्वांचे सुख हवे संघर्ष नव्हे. **स्त्री ही त्याग, वात्सल्य आणि शांतीची** देवी आहे. स्त्रीशक्ती नवनिर्माण करते व मनुष्याला देवत्वाकडे घेऊन जाते. म्हणून स्त्रीला समाजात सन्मान मिळाला पाहिजे.

भारतीय समाजामध्ये स्त्रियांच्या सामाजिक दर्जासंदर्भात कमालीचा विरोधाभास आढळतो. एका बाजूला स्त्रियांचे धर्माधिष्ठित गौरवीकरण (काल्पनिक) व दुसऱ्या बाजूला समाजात प्रत्यक्षात टोकाचे दुय्यम स्थान, शोषण असा हा विरोधाभास आहे. एका बाजूला ‘स्त्री-प्रतिष्ठा’ हा समाजाच्या श्रेष्ठत्वाचा निकष (पुस्तकी) व दुसऱ्या बाजूला सामाजिक स्तरीकरणामध्ये शेवटचे स्थान असा हा विरोधाभास आहे. भारतीय समाज मुख्यत: पुरुषप्रधान राहिला आहे. अर्थात, केरळमधील नायर, मंगळूरमधील शेट्टी, बंगाली समाज व काही भटक्या जमातींमध्ये स्त्रीप्रधानतेचे प्रमाण दिसते. परंतु, सर्वसामान्यपणे विचार करता, भारतीय समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे प्रकर्षाने जाणवते. तद्वतच, अनेक रूढी, परंपरा (अनेक धर्मातील) यांमुळे स्त्रियांवर अन्याय, शोषण, सामाजिक विभक्तीकरण झाल्याचे दिसते. स्त्रियांना सार्वजनिक जीवनातील सहभाग नाकारण्यात आला. या पाश्र्वभूमीवर भारतात स्त्रियांची भूमिका, त्यांचे शोषण, न्याय्य अधिकार यावर आधारित चळवळी व संघटना उभ्या राहिल्या.

भारतातील स्त्री-चळवळीचे तीन टप्पे करता येतील- पहिला टप्पा (१८३०-१९१५); दुसरा टप्पा (१९१५-१९४७) तिसरा टप्पा (१९४७ पासून पुढे).

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

पहिल्या टप्प्यामध्ये मुख्यत: काही पुरोगामी पुरुषांच्या पुढाकारामुळे महत्त्वाचे बदल घडताना दिसतात. यामध्ये सती-बंदी (१८२९), विधवा पुनर्विवाह कायदेशीर मान्यता (१८५६), स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध (१८७०), आंतरजमातीय विवाहास मान्यता (१८७२) संमतीवयामध्ये वाढ (१८९१) यांचा समावेश होतो. यासंदर्भात ईश्वरचंद्र विद्यासागर, वीरेशलिंगम पंतुलू, पंडिता रमाबाई, राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे, सुब्बलक्ष्मी, जोतिबा- सावित्रीबाई फुले यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. दुसऱ्या टप्प्यामध्ये भारत महिला परिषद, भारत स्त्री महामंडळ, विमेन्स इंडियन असोसिएशन (WIA), नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन फॉर इंडिया, ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स (AIWC) या संघटनांचा उदय होतो. या संघटित चळवळीद्वारे प्रांतामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार (१९२१), बालविवाह प्रतिबंधक कायदा (१९२९), स्त्रियांना मर्यादित प्रमाणात मालमत्तेचा हक्क (१९३७) यांसारखे महत्त्वपूर्ण बदल झाले.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री-चळवळीचे पुन्हा तीन टप्पे करता येतील. १९४७ पासून ते १९७० च्या दशकापर्यंत राष्ट्र बांधणीच्या कार्याला प्राधान्य दिले गेले. अर्थात संविधानात अंतर्भूत मूलभूत हक्क व राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यांमध्ये स्त्रियांचे हक्क व अधिकार यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला. पण, या तरतुदींच्या अंमलबजावणीतील अपयशामुळे १९७० च्या दशकात स्त्री-चळवळीचा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दुसरा टप्पा सुरू झाला. या टप्प्यामध्ये असमान वेतन, स्त्रियांचे 'अकुशल' कामगारांत वर्गीकरण, विनामोबदला श्रम, सामाजिक संस्थांमधील (जात, धर्म, वर्ग, कुटुंब इत्यादी) सत्तेच्या संरचनेतली पुरुषी वर्चस्व या समस्यावर भर होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील २१ व्या शतकातील टप्प्यामध्ये स्त्री-चळवळ स्त्री-पुरुष समानतेच्या पलीकडे जाऊन स्त्रियांची वैयक्तिक जीवन ठरवण्याची सत्ता व त्यांचे सक्षमीकरण यांसारख्या मुद्द्यावर प्रकाश टाकते. भारतामध्ये स्त्री-चळवळीचा एक प्रवाह वरील आढाव्यावरून स्पष्ट होतो. आजही अनेक गंभीर स्त्री-समस्या भारतीय समाजासमोर उभ्या आहेत. रूढी- परंपरांचा पगडा, प्रत्येक धर्मातील खासगी जीवन नियंत्रित करणारे धार्मिक कायदे (धर्मशास्त्र, शरीया, इ.) विपरीत स्त्री-पुरुष प्रमाण (९३३ : १०००), समान नागरी कायद्याचा अभाव, कौटुंबिक हिंसा, हुंडाबळी, बलात्काराच्या घटना, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न यांसारख्या समस्यांना स्त्री-समाजाला आजही तोंड द्यावे लागते. भारतीय समाजामध्ये स्त्री-समस्यांना इतरही आयाम आहेत. वेगवेगळ्या वर्गातील, जाती- जमातीमधील, प्रदेशामधील स्त्री-समस्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे. शहरी स्त्रियांच्या समस्या, ग्रामीण व शेतमजूर असणाऱ्या स्त्रियांच्या समस्या, भटक्या व आदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहेत. भारतातील काही आर्थिकदृष्ट्या समृद्ध प्रदेशातील विपरीत स्त्री-पुरुष गुणोत्तरामागील कारणांचा वेध घेणे अपेक्षित आहे.समाजातील स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास (वर्तमानपत्राचे वाचन) व स्त्रियांच्या समस्येची कारणे व उपाय यावर भर देणे आवश्यक ठरते. तद्वतच, स्त्री-सक्षमीकरण, सार्वजनिक क्षेत्रातील स्त्री-सहभाग वाढवण्यासाठीच्या उपाययोजना, स्त्रियांच्या राजकीय प्रतिनिधित्वामध्ये वाढ होण्यासाठीचे उपाय, समाजाची मानसिकता बदलण्यासाठीचे उपाय यांसारख्या बाबींचा अभ्यास आवश्यक ठरतो. एकविसाव्या शतकातील नवीन घटकांचा स्त्रियांच्या सामाजिक स्थितीवर मूलगामी परिणाम होत आहे.

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

**महिलांचे समाजातील स्थान:**

4% - जागतिक मानांकन मानले जाणारा मिशेलिन स्टार मिळालेल्या महिला शेफ.

24% - जगभरातील महिला खासदारांचे प्रमाण. राजकारणात निवडून येणाऱ्यांत ४ पैकी एक महिला असते.

30% - विज्ञान क्षेत्रात कार्यरत महिला

7% - जगातील महिला सीईओ

23% - पुरुषांच्या तुलनेत पगारातील तफावत

80% - दुष्काळी भागात दूरवरून पिण्याचे पाणी आणण्याची जबाबदारी

48% - शिक्षण घेऊ न शकणाऱ्या मुली

24% - जगातील महिला पत्रकारांचे प्रमाण

जगात बहुतांश देशात पुरुषसत्ताक पद्धती अस्तित्वात आहे जिथे स्त्रियांना कमी लेखले जाते. फक्त चूल आणि मूल यापुरते स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित ठेवले जाते. भारत देशसुद्धा याला अपवाद नव्हता. भारतात नेहमीच पुरुषांच्या मानाने स्त्रियांचे स्थान दुय्यम राहिले होते, किंबहुना ते तसे राहावे म्हणून पुरुषांनी प्रयत्न केले होते बाहेरची कामे पुरुषांनी करावीत आणि घरातील चार भिंतीच्या आतली कामे स्त्रियांनी करावीत असा जणू अलिखित नियमच बनला होता.

पण म्हणतात ना, स्प्रिंग जेवढी दाबून ठेवाल, तेवढीच ती जास्त जोरात उफाळून वर येते. त्याचप्रमाणे भारतात सुद्धा स्त्रियांनी अशीच समानतेची क्रांती केली आणि त्यांच्यातले गुण सर्वांनाच समजले. **स्त्रियांनी दाखवून दिले की त्या कुठल्याच क्षेत्रात पुरुषांपेक्षा मागे नाहीत.** शिक्षणक्षेत्र असो की व्यापार, मजुरी असो की विज्ञान तंत्रज्ञान, प्रत्येक प्रत्येक क्षेत्रात आज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या आहेत. त्यापेक्षा त्यांचे एक पाऊल पुढेच आहे असे म्हंटले तर जास्त समर्पक असेल.एवढं सगळं मिळवूनही एक क्षेत्र मात्र असं होतं ज्यात पुरुषांची मक्तेदारी अबाधित राहिली होती. ते म्हणजे वाहन चालवणे. कारण, सर्वांचेच असे मत होते की, स्त्रियांच्या शारीरिक क्षमतांच्या मर्यादेमुळे त्यांना या क्षेत्रात काही करता येणार नाही चालकांच्या अनियमित वेळा, अफाट श्रम आणि सदैव एकाग्रता राखणे या बाबी स्त्रियांना जमणार नाहीत पण ऐकतील त्या स्त्रिया कसल्या? त्यांनी दाखवुनच दिले की या कामातही त्या अजिबात मागे नाही त्याचा परीणाम म्हणून आज आपण स्त्रियांना दुचाकी, चारचाकी, ऑटोरिक्षा, मालवाहतूक एवढंच काय रेल्वे सुद्धा चालवताना पाहत आहोत हे इतक्यावरच थांबत नाही, स्त्रिया जमिनीवरच नाही तर अंतराळात सुद्धा भरारी मारून आल्याचे आपण बघतोय **ती म्हण भारतीजेय महिला पायलटांची जगाच्या तुलनेत संख्या** हाती आलेल्या रिपोर्ट नुसार, सद्यस्थितीत भारताने जगातल्या इतर कुठल्याही देशापेक्षा महिला पायलट भरती अधिक प्रमाणात केली आहे.

**जगाची महिला विमान चालकांची सरासरी ५% टक्के आहे तर भारताची त्याच्या दुपटीपेक्षा जास्त म्हणजे १२% आहे. आहे ना गौरवास्पद गोष्ट?** पुरुषांची एकहाती सत्ता असलेल्या या क्षेत्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात शिरकाव करून घेणे फार कठीण

काम. जेट एअरवेजच्या सिनिअर पायलट श्वेता सिंग या स्पष्टपणे म्हणतात,

"हे पुरुषी वर्चस्व मोडीत काढणे आमच्यासाठी खूप मोठे आव्हान होते."

**या हवाई क्षेत्रातील एक चांगली बाब म्हणजे इतर क्षेत्राप्रमाणे यात लिंगभेदावर पगार ठरत नाही.** केंद्रीय करारानुसार, पायलटला त्याचे पेमेंट हे वरीष्ठता आणि किती तास काम केले यावर ठरवले जाते. त्यामुळेच स्त्री असो की पुरुष, जितका वेळ काम केले तितका पगार उचलता येतो. भेदभावाला जागाच नाही.

महिलांना पूर्णवेळ काम करता यावे म्हणून अनेक सवलतीही दिल्या गेल्या आहेत. प्रत्येक विमानतळावर महिला विमान चालकांच्या मुलांसाठी पाळणाघरे स्थापन केलेली आहेत. तसेच, महिला चालक गर्भवती असताना त्यांना विमान उडवण्याऐवजी ऑफिस मध्ये बसूनही त्याच पगारावर काम करता येते. एक मुद्दा नेहमी मांडला जातो की, या क्षेत्रात काम करण्याच्या वेळा या अत्यंत विषम असतात. चोवीस तासांपैकी सकाळ आहे की रात्र हे न पाहता काम करावे लागते. त्यामुळे अर्थातच महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो या मुद्द्याचे खंडन करताना 'पायलट श्वेता सिंग' म्हणतात की, "ही अत्यंत चुकीची समजूत आहे. इतर क्षेत्रापेक्षा महिला या क्षेत्रात अतिशय सुरक्षित असून याला सर्वात 'सुरक्षित नौकरी' असे मानण्यास हरकत नाही" याची खात्री तेव्हा पटते जेव्हा महिलांना घरापर्यंत सोडण्यासाठी अथवा आणण्यासाठी सशस्त्र सुरक्षा जवान तैनात केलेले दिसून येतात.

आधीच्या दशकापेक्षा या दशकात हवाई क्षेत्रात करिअर करणे हे अधिक सोपे झालेले आहे असे इंडिगो एअरलाईन्स च्या पायलट रूपींदर कौर यांचे म्हणणे आहे **हा अभ्यासक्रम ज्या 'बॉम्बे फ्लाईंग क्लब' या संस्थेत शिकवला जातो तिथले महिलांचे प्रवेश अर्ज गेल्या पाच वर्षात १०% वरून तब्बल २५% पर्यंत वाढले आहेत.** यावरून महिलांना हवाई क्षेत्रात करिअर करण्यात किती उत्सुकता आणि इच्छा आहे याचा सहज अंदाज येऊ शकेल. इथे प्रवेश मिळवणे सोपे नाहीच परंतु प्रवेश मिळवल्यानंतर इथे टिकून राहणेही अत्यंत कठिण काम आहे हे काही महिला पायलट सांगतात. ५० वर्षे वय असलेल्या एअर इंडियाच्या 'कॅप्टन क्षमता बाजपेयी' दोन दशकांपासून निरंतर सेवा बजावत आहेत. दिल्ली ते सॅन फ्रान्सिस्को अश्या सर्वात लांब रस्त्यावर पूर्ण विमानात महिला कर्मचारी घेऊन प्रवास करण्याचा रेकॉर्ड त्यांच्या नावावर नोंदवला गेला आहे ज्यावेळी क्षमता बाजपेयींनी विमान चालक बनण्याचा निर्णय घेतला तो काळ फार वेगळा होता त्यांना घरातून आणि समाजातूनही कडाडून विरोध झाला पण त्या झुकल्या नाहीत. त्यांनी एक यशस्वी पायलट बनून इतर महिलांना दिशा दाखवण्याचे काम केले **बिहार मधील 'फ्लाईंग क्लब' च्या विद्यार्थी असणाऱ्या 'निवेदिता भसीन' यांनी जेव्हा पायलट प्रशिक्षणासाठी १९८७ मध्ये प्रवेश घेतला, तेव्हा त्या बॅच मधील एकमेव महिला होत्या.** त्यांना बाहेरची असल्यासारखी वागणूक दिली गेली होती. जेव्हा त्या शिकत होत्या तेव्हा त्या चार महिन्यांच्या गर्भवती होत्या.तरीही त्यांना अत्यंत खडतर प्रशिक्षण घ्यावे लागले. दुर्दैवाने त्यावेळी या क्षेत्रात पुरुषांचा पगडा असल्याने महिलांच्या मातृत्व रजेविषयी कुठले नियम बनवलेच गेले नव्हते.

ही दोन उदाहरणे तसेच आणखीही काही उदाहरणे जसे की, **"कॅप्टन जसविंदर कौर, कॅप्टन अनुश्री वर्मा इत्यादी आजकालच्या**

**नवीन प्रशिक्षणार्थींसमोरची आदर्श उदाहरणे आहेत."** यांनी भारतीय महिलांमध्ये या क्षेत्रात येण्याची चेतना जागवली आणि त्याचे परिणाम आपण बघतच आहोत. महिला जिथे तडजोड न करता पुरुषांच्या बरोबरीने काम करू शकतील अश्या हवाई क्षेत्रासारख्या अनेक करिअर क्षेत्रांची आज भारताला गरज आहे.

सध्यातरी जगाच्या मानाने आपण भारतीय विमान क्षेत्रात तरी **'महिला विमान चालक'** या संख्येत फार पुढे आहोत याचा आनंद मानुयात. आणि अश्या अनेक ठिकाणी महिलांना बरोबरीची वागणूक देऊन भारताला महासत्ता बनवण्याच्या दिशेने वाटचाल करूयात.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


- इंडिया सिन्स इंडिपेंडन्स - बिपीन चंद्र
- पायाभूत अभ्यासक्रम - एम. ऐस. लिमण ऐस . जे . वाघमारे
- महात्मा फुले साहित्य आणि चळवळ - हरी नरके
- loksatta.com/caree-vrutantta/careervrutant-lekh/changing-the-status-0f women-in- india-society-1160190/
- esakal.com/womens-corner/article-womens-community-place-268701
- inmarathi.com/52073/Indian-women-breaking-stereotypes/


**Cite This Article:**

*कु. समीना दस्तगीर अत्तार, (2022*) स्त्री भारतीय समाजात स्त्रियांचे सामाजिक स्थान : काल आज आणि उद्या , ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 185-190.*